# पालकांना सूचना

## (शाळेतून लवकर निघण्यासाठी प्रोटोकॉल)

प्रिय पालकांनो,

हार्दिक शुभेच्छा!

आपल्या विद्यार्थ्यांनी शाळेतून लवकर निघणे, आरोग्य बिघडणे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव ज्यासाठी विद्यार्थ्याला लवकर निघावे लागू शकते, त्यांच्या सुरक्षिततेची आणि कल्याणाची खात्री करण्यासाठी खालील महत्त्वाच्या मार्गदर्शक तत्त्वांकडे लक्ष देण्याची आम्ही विनंती करतो.

१. तुमच्या मुलाला थोडेसे आजारी वाटत असेल किंवा इतर कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्याला शाळेतून लवकर निघावे लागू शकेल अशा विद्यार्थ्यांना शाळेत पाठवू नका. अशी आम्ही तुम्हाला जोरदार शिफारस करतो आणि आग्रह करतो. विद्यार्थ्याच्या सुरक्षिततेसाठी आणि शाळेचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी हे महत्वाचे आहे.

२. **शाळेतून लवकर निघणे:** जर तुमच्या मुलाला अगदी आपत्कालीन परिस्थितीत लवकर शाळेतून न्यावे लागले तर आम्ही विनंती करतो की पालकांनी त्याला/तिला स्वतः येऊन फक्त विश्रांतीच्या वेळीच (break time) घेऊन जावे.

३. **प्रक्रिया:** जर पालक शाळेत येऊ शकत नसतील तर, अधिकृत व्यक्तीमार्फत शाळेच्या स्वागत कक्षाला (Reception) संदेश पाठवावा लागेल, खाली दिलेल्या नमुन्याचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

४. कृपया खाली सुचवलेला मेसेज टेम्पलेट कॉपी-पेस्ट करा:

**“मी, [पालकांचे पूर्ण नाव], [वर्गात] शिकणाऱ्या [मुलाचे पूर्ण नाव] चा पालक, [व्यक्तीचे पूर्ण नाव आणि फोन नंबर, मुलाला घेण्यासाठी येत आहे], [नातेवाईक], यांना, आज, [तारीख], [कारण] शाळेतून माझ्या मुलाला शाळेतून घेण्याची परवानगी देतो. मी येऊ शकत नसल्यामुळे, मला माहिती आहे आणि मला समजते की संबंधित व्यक्तीला मुलाला सोपवल्यानंतर शाळा त्याची जबाबदारी घेणार नाही.” माझा फोन नंबर ______________________________ आहे.**

५. मुलाला सोडण्यापूर्वी संबंधित व्यक्तीने शाळेच्या गेटवर आणि रिसेप्शनवर पडताळणीसाठी त्यांचे  ओळखपत्र आणि तुमचा संदेश सादर करणे आवश्यक आहे. रिसेप्शन पालकांना पडताळणी कॉल देखील करेल.

६. **कृपया लक्षात ठेवा:** आगमनानंतर, पालक/पालकांना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान ३० मिनिटे वाट पहावी लागू शकते.

७. पालकांना दुसऱ्या दिवशी शाळेला हार्ड कॉपी (स्वाक्षरीसह टेम्पलेटचा लेखी संदेश) द्यावा लागेल.

शिस्त आणि सुरक्षित शालेय वातावरण राखण्यात आम्हाला मदत करण्यासाठी तुमच्या सहकार्याबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत.

विनम्र,

फादर ॲन्थोनी फोन्सेका

प्राचार्य

**मूळप्रतीतून मराठी अनुवाद : शिक्षिका सारीका डिसोजा**